# भारताचे अण्वस्त्र धोरण

**डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे,** प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

.............................................................................................................................

**प्रस्तावना ः**

स्वांतत्र्यानंतर भारताने पूर्ण आण्विक निशस्त्रीकरण व अणू ऊर्जेचा शांततेसाठी वापर याचे समर्थन करून तसेच सुरवातीच्या काळात आण्विक धोरण अवलंबले होते. भारताने सुरवातीपासूनच अण्वस्त्र हे राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय सुरक्षीततेच्या दृष्टिने बाधक मानले असून त्यांच्या निर्मितीला विरोध केला आहे. संपूर्ण जग हे अण्वस्त्र निःशस्त्रीकरण व अण्वस्त्र परिक्षण प्रतिबंधासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेत १९६१, १९७८ व १९८८ ला प्रस्ताव मांडला. १९६३ ला आंशिक अण्वस्त्र परीक्षण करार करण्यात आला व त्यात भारताचा अग्रणी पुढाकार होता. या पध्दतीने भारताने सुरवातीपासूनच अण्वस्त्र धोरणाबावत 'शांततेसाठी अणू' असे धोरण राबवले पण जागतिकीकरणाच्या बदलाबरोबर संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत एनपीटी व सीटीबीटी करार केले पण त्यावर भारताने स्वाक्षरी केली नाही तसेच भारताने बदलत्या परिस्थितीला अनुसरून अण्वस्त्र धोरणाच्या अंमलबजावणीत बदल केला त्या विषयी प्रस्तुत लेखात ऊहापोह केला आहे.

**भारताच्या अण्वस्त्र धोरण**

स्वातंत्र्यानंतर भारताने आण्विक धोरणासंबधी सुरवातीला भारताने अणुऊर्जा आयोगाची स्थापना डॉ.होमी भाभा यांच्या नेतृत्वाखाली १९५३ साली केली. याचा आयोगाचा उद्येश अणुऊर्जेची निर्मिती करणे हा होता. पण भारताकडे अणुऊर्जासाठी लागणारे अणुइंधन नसल्याने जगातील फान्स,अमेरिका,कॅनडा,रशिया या देशांच्याकडून सहकार्य घेतले तसेच अणुऊर्जा निर्मिती तंत्रज्ञान ही या राष्ट्राकडून मिळाले. पण आंतराष्ट्रीय राजकारणाच्या बदलत्या परिस्थितीत भारताचे अमेरिकेशी संबध तणावपूर्ण बनल्याने भारताच्या अणुसहकार्यावर परिणाम झाला. यामुळे भारताने स्वतः हे तंत्रज्ञान विकसित करण्याचे ठरवले व त्याचा परिपाक म्हणजे पहिली भूमिगत अणुचाचणी १९७४ ला भारताने केली. त्यावेळी भारताने अणुतंत्रज्ञान हे शांततेसाठी आहे असे जाहीर केले. असे असले तरी भारताच्या या कृतीने जागतिक राजकारणात नवे बदल झाले व जागातील विकसित राष्ट्रांनी अनेक प्रतिंबध लावत भारतावर दबाव वाढवला पण भारत विकसित राष्ट्राच्या दबावला बळी पडला नाही व आपला अणु कार्यकम चालुच ठेवला व १९९८ ला पुन्हा अणु चाचणी केली. यानंतर भारताने आण्विक धोरण जाहीर केले हे धोरणात 'शांततामय वापरासाठी अणू' आणि 'अण्वस्त्राचा प्रथम वापर करणार नाही' या तत्व स्पष्ट केले.

भारताच्या आण्विक धोरणातील तत्वे खालील प्रमाणे

१.अण्वस्त्रांचा प्रथम वापर नाही

२.अण्वस्त्रांचे वाळगण्याचा उददेश शस्त्रुराष्ट्राला युध्दापासून परावृत्त करणे होय.

३.अण्वस्त्रांचा वापर जैविक व रासायनिक अस्त्रांचा सैन्य दलावर वापर झाला तरच होईल.

४.भारत बिगर अण्वस्त्रधारी राष्ट्राविरूध्द अण्वस्त्रांचा वापर करणार नाही तसेच जमीन, आकाश व समुद्रात अण्वस्त्र डागण्याची क्षमता भारताकडे आहे आणि भारतावर अण्वस्त्राचा हल्ला झाला तर त्याल प्रतिउत्तर देण्याची क्षमता आहे.

अशा पध्दतीने भारताने आपले अण्वस्त्र धोरणात स्पष्टपणा ठेवलेला असून जवाबदार आण्विक शक्तिची जाणीव करून दिली आहे तसेच शांततेसाठी अणू तंत्रज्ञानाच्या वापरावर अधिक भर दिला आहे. अण्वस्त्राचा स्वरंक्षणासाठी पर्याय ठेवून अणू चाचण्याचे बंधन स्वतःवर घालून अण्वस्त्र धोरणात नैतिकता निर्माण केली आहे.

**भारताचे जागतिक अण्वस्त्र धोरणा विषयी मतभेद**

भारताने सुरवातीपासूनच अण्वस्त्राला विरोध केला आहे तसेच यावदल जागतिक जनमत तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत आंशिक अण्वस्त्र परिक्षण कराराचा प्रस्ताव आणला व त्याचे समर्थन केले. १९६६ ला संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेच्या राजकीय सल्लागार समितीने अण्वस्त्र प्रसारवंदी कराराचा प्रस्ताव मंजूर करून तो प्रस्ताव १९६८ ला महासभेपुढे सादर केला तेव्हा भारतासहीत इटली, ब्राझील, अर्जेण्टीना, जपान इत्यादी राष्ट्रांनी याला विरोध केला तसेच जपानने अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्रविरहीत राष्ट्रांवर हल्ला करणार नाही असे आश्वासन दयावे असे स्पष्ट केले.

याबददल भारताने या अण्वस्त्र कराराला भेदभावपूर्ण मानले आहे कारण या करारात जगाला अण्वस्त्रधारी राष्ट्र व अण्वस्त्रविरहीत राष्ट्र अशा दोन विभागात विभागले जातील. तसेच हा करार अण्वस्त्रधारी राष्ट्रानां अण्वस्त्र परिक्षणाची सूट देता तसेच विगर अण्वस्त्रधारी राष्ट्रांनाही शांतपूर्ण अणू परिक्षणाबाबत बंदी घालते ज्यामुळे अण्वस्त्रनियंत्रणाचा उददेश दूर्ल क्षित होतो व अण्वस्त्र संपन्नतेला प्रोत्साहन देते. याचप्रमाणे भारताने चीनच्या हा अण्वस्त्र संपन्नते मुळे भारताच्या स्वरंक्षणासाठी धोका निर्माण होऊ शकतो याकारणामुळे भारताने या कराराला विरोध केलेला आहे.

अण्वस्त्रप्रसार बंदी करारातील फोलपणामुळे हा करार अनेक राष्ट्रांनी नाकारल्यानंतर जागतिक स्तरावर अण्वस्त्र परिक्षणाला प्रतिबंध करण्यासाठी सर्वसमावेशक चाचणी बंदी करार आणण्यासाठी भारताने अमेरिकेबरोबर महासभेत प्रस्ताव आणण्यास पुढाकार घेतला पण यात अमेरीकेने अण्वस्त्र निशस्त्रीकरणच्या मुळ हेतू दूर्लक्षीत केल्याने भारताने या प्रस्तावाला विरोध केला. तरीही १९९६ ला सर्वसमावेशक चाचणी बंदी करार जिनेव्हा येथील युनोच्या परिषदेत संमत झाला पण या प्रस्तावावर भारताने सही केली नाही. या प्रस्तावास १४२ देशांनी संमती दर्शविली असून या प्रस्तावामध्ये भूमिगत व खुल्या वातावरणात कोणत्याही प्रकारची अणुचाचणी घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे तसेच जर एखाद्या देशाने या कराराचे उल्लंघन केल्यास त्यावर आंतरराष्ट्रीय निरीक्षण प्रणाली लागू होईल व त्या देशावर वंधीने लावली जातील. अशा प्रकारच्या तरतुदी होत्या. भारताने या प्रस्तावाला विरोध करताना पुढील कारणे स्पष्ट केली आहेत.

१.सर्वसमावेश चाचणी बंदी करार हा पक्षपातीपूर्ण असून जगामध्ये अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या मक्तेदारी निर्माण करणार आहे. यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वानां समान संधी या तत्वाला बाधा येते.

२.भारताच्या मते हा करार अण्वस्त्र प्रसाराला पूर्ण प्रतिबंध करत नाही यात कॉम्प्यूटर प्रणालीच्या माध्यमातून परिक्षणावर बंदी नाही. व अशी प्रणाली फक्त अण्वस्त्रधारी राष्ट्रांकडेच आहे.

३.या करारात पूर्ण निशस्त्रीकरण व शस्त्रनियंत्रणा विषयी कोणत्याही तरतूदी नाहीत.

४.सर्वसमावेशक चाचणी बंदी करार भारताच्या राष्ट्रीय सुरक्षासंबधी कोणतेही उपाय स्पष्ट करत नाही

५. सर्वसमावेशक चाचणी बंदी करार हा अण्वस्त्र राष्ट्रांमध्ये अणु तंत्रज्ञानाची देवाण घेवाणाची तरतूद आहे. यातून इतर राष्ट्रांना अणु ऊर्जेसाठी हे तंत्रज्ञान मिळणे अशक्य होणार आहे. अशा प्रकारच्या कारणांनी भारताने या करारावर सही केली नाही. यामुळे या कराराची अमंलबजावणी होऊ शकली नाही. भारताप्रमाणेच पाकिस्ताना व ईजरायल या देशांनी करारावर सही केली नाही. पण या देशांपेक्षा भारताने सही न करणे हा जागतिक स्तरावर चर्चचा विषय आहे. अशा प्रकारे भारताचे जागतिक स्तरावर अण्वस्त्र धोरणाबाबत मतभेद आहेत.

**२००१ नंतर भारताच्या अण्वस्त्र धोरण बदल व जागतीक राजकारण**

भारताने आपल्या अण्वस्त्र धोरणात अण्वस्त्राचा प्रथम वापर करणार नाही या तत्वाला मध्यवर्ती स्थान दिले आहे. तरीपण जागतिक राजकारणाच्या बदलत्या परिदृषात भारताने काही प्रमाणात आकमक भूमिक स्विकारून आपण अण्वस्त्रधारी राष्ट्र असल्याचे स्वरंक्षणासाठी घोषित केले आहे. १९९८च्या पोखरण अणुचाचणीनंतर भारतावर अनेक देशांनी निर्वध घातले. पण उदारीकरणाच्या प्रकीयेत भारत एक जागतिक बाजारपेठ म्हणून उदयास येवू लागली, भारताचे लष्करी सामर्थ वाढले, आर्थिक विकास दर वाढला इत्यादी कारणाने तसेच भारत अणुऊर्जाची मोठी बाजारपेठ असल्याने फार काळ भारतावर र्निबंध लादावे योग्य व टिकणरे नाहीत व भारताने आपला अणुकार्यकम विकासात्मक व शांततेसाठी चालवण्याचे कृतीतून स्पष्ट केल्याने सर्वप्रथम अमेरिकेनेच याबावत पुढाकार घेऊन भारताशी अणुसहकार्याला सुरवात केली. पण भारताने एनपीटी व सीटीबीटी वर स्वाक्षरी केली नाही तसेच भारत हा आंतरराष्ट्रीय अणुउर्जा गटाचा सदस्य नसल्याने भारतावरोबर अणुसहकार्य करण्यास अडचण येत होती तसेच येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेने भारताशी व्दीपक्षीय पातळीवर नागरी अणुऊर्जा करार २०१० साली केला. यानंतर अमेरिकेने देशांतर्गत वनटाईम वेव्हर अंतर्गत भारताला सूट दिली व अणुइंधन पुरवठा गटाचे सदस्य मिळवण्याचे आश्वासन दिले गेले. भारतानेही लष्करी व नागरी प्रकल्पाची विभागणी करून नागरी प्रकल्प आंतराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाचा देखरेखीखाली आणण्याचे मान्य केले. अशा पध्दतीने भारताच्या जागतिक स्तरावर अणु सहकार्याला सुरवात झाली. अमेरिकेने अणूऊर्जाबावत १२३ करार केला तसेच रशियानेही

याबाबत सकारात्मक धोरण अवलंबले व भारताशी दोन दशकात १२ अणूऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याचे करार केला. यानंतर चीन, फ्रान्स, ब्रिटन, कॅनडा, आस्ट्रेलिया, जपान व श्रीलंकेशी अणूऊर्जा सहकार्याचा करार केला या करारामुळे भारतातील अणूऊर्जा प्रकल्पांना अणूइंधन पुरवठा मिळणे सुलभ झाले ज्यामुळे भारतातील अणूऊर्जा कार्यक्रमाला चालना मिळाली

भारताच्या अणुऊर्जा धोरणाबाबत बदलत्या राजकारणात भारताने आपले धोरण अत्यंत स्पष्ट केले आहे. यात भारताने जागतीक राजकारणाच्या दबावाला बळी न पडता आपली भूमिकेत बदल केला नाही तसेच शांततेसाठी अणु या तत्वाचा अवलंब करून जागतिक स्तरावरील देशांचे मतपरिवर्तन केले आहे. सध्या भारताला आंतराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेचे सदस्यत्व मिळाले नाही. याबाबत जागतिक स्तरावर चीनची विरोधाची भूमिका आहे. असे असले तरी भारताने जगातील इतर देशाशी सहकार्य घेतले आपले धोरणात बदल न करता आपली प्रतिष्ठा राबवण्याचे अण्वस्त्र धोरणातून निदर्शनास येते.

संदर्भ सूची ः

१. शैलेंद्र देवळाणकर, आंतराष्ट्रीय राजकारण आणि संबध, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर २००१

२. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००७

३. परांजपे,श्रीकांत, भारताचे संरक्षण धोरण ः नवी आव्हाने, नवभारत २००७

४. देवदत्त, 'भारताचे राजकीय पोखरण, सत्याग्रही, मार्च २००६

५. बुरटे,प्रकाश,अणुकरार आणि शहेनशहा जॉर्ज बुश,साधना,२००६